**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**
५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.
Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com

अत्यंत महत्वाचे/परीक्षा प्राधान्य

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/९२६
दिनांक-२०/०६/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक,
निर्मला कॉन्व्हेंट हायस्कूल,सदर बझार,सातारा

**विषय:- कोल्हापूर विभागीय मंडळाचे अधिकृत वितरण केंद्र म्हणून आपल्या शाळेची नियुक्ती केलेबाबत**

**संदर्भ:- जा.क्र./शिक्षण माध्य./वि.कें./४६१२/२०२३ दिनांक-१८/०६/२०२४ चे पत्र**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळाच्या कार्यालयीन कामकाजाकरिता सातारा(१०), तालुक्यांचे अधिकृत वितरण केंद्र म्हणून आपल्या शाळेची नियुक्ती ०१ जुलै २०२४ पासून पुढील तीन वर्षाकरिता करण्यात येत आहे.

वरील तालुक्यातील सर्व शाळा/क.महाविद्यालय प्रतिनिधींना मंडळाचे साहित्य वितरण केंद्रावर जमा करणे व साहित्य घेवून जाणे सोईचे व्हावे यासाठी प्रत्येक शाळेला रोटेशन प्रमाणे पुढील तीन वर्षासाठी मंडळाचे अधिकृत वितरण केंद्र म्हणून नियुक्ती देण्यात येत आहे. तसेच शाळांच्या संख्येनुसार आपण केलेल्या कामकाजाचे मानधन व मंडळ कार्यालयात येणे-जाणे यासाठी प्रवासभत्ता मंडळाकडून त्या-त्या वेळी अदा केले जाईल.

तरी उपरोक्त तालुक्याकरिता मंडळाचे अधिकृत वितरण केंद्र म्हणून ०१ जुलै २०२४ पासून पुढील तीन वर्षाकरिता काम पहावे.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीसाठी:-

१) शिक्षणाधिकारी(माध्य.)जिल्हा परिषद,सातारा
२) मुख्याध्यापक, के.एस.डी.शानभाग विद्यालय व ज्यु.कॉलेज,सातारा ता.सातारा जि.सातारा यांना कळविण्यात येते की, आपण दि.३० जून २०२४ पर्यंत मंडळाचे वितरण केंद्राचे काम पहावयाचे आहे. तदनंतर दि.०१ जुलै २०२४ पासून मंडळाने नव्याने नियुक्त केलेल्या उपरोक्त वितरण केंद्रास कामकाजाबद्दल आवश्यक ते मार्गदर्शन व सहकार्य करावे.
३) सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य,सातारा (१०) यांना कळविण्यात येते की,

उपरोक्त प्रमाणे दि.०१/०७/२०२४ पासून मंडळाचे अधिकृत वितरण केंद्र **निर्मला कॉन्व्हेंट हायस्कूल, सदर बझार,सातारा ता.सातारा जि.सातारा** हे असणार आहे. त्यामुळे मंडळाचे साहित्य स्विकारणेसाठी या नवीन वितरण केंद्रावर पाठविण्यात यावे.